



दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | मंगळवार २० मे २०२५ | अंक १५८ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# सायबर फसवणूक टाळण्यासाठी केंद्र सरकारचे मोठे पाऊल, फोनवरील तक्रार एफआयआर होणार

देशात सायबर गुन्हेगारी वाढली आहे. सायबर फसवणूक अनेक तक्रारी रोज येत असतात. परंतु सायबर गुन्हेगार क्वचितच कायद्याच्या कचाट्यात येतात. आता केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सायबर गुन्हेगारीसंदर्भात मोठे पाऊल उचलले आहे. समन्वय केंद्र (I4C) द्वारे गुन्हेगारांना पकडण्यासाठी नवीन ई-झिरो एफआयआर उपक्रम सुरू केला आहे. सुरुवातीला दिल्लीसाठी पायलट प्रोजेक्ट म्हणून हे सुरू करण्यात आले आहे. ही नवीन प्रणाली NCRP किंवा 1930 वर दाखल केलेल्या सायबर तक्रारींचे स्वयंचलितपणे एफआयआरमध्ये रूपांतर करणार आहे. यामुळे तपासांना गती मिळेल अन् सायबर गुन्हेगारांवर लवकर कारवाई होईल. सध्या दिल्लीसाठी सुरु असलेला हा पायलट प्रोजेक्ट लवकरच देशभर सुरु होणार आहे. सायबर आर्थिक गुन्ह्यांचे स्वयंचलितपणे एफआयआरमध्ये रूपांतर करण्याच्या या प्रणालीत सुरुवातीला दहा लाख रुपयांपेक्षा जास्त फसवणुकीची मर्यादा दिली आहे. या प्रणालीसंदर्भात सोशल मीडियाद्वारे माहिती देताना अमित शाह यांनी म्हटले की, सायबर-



सुरक्षित भारत निर्माण करण्यासाठी मोदी सरकार सायबर सुरक्षा पायाभूत सुविधा मजबूत करत आहे. गृह मंत्रालयाच्या भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्राने (I4C) कोणत्याही गुन्हेगारावर जलदगतीने कारवाई व्हावी, यासाठी नवीन ई-झिरो एफआयआर उपक्रम सुरू केला आहे. झिरो एफआयआरचा अर्थ कोणताही व्यक्ती देशाच्या कोणत्याही ठिकाणावरुन तक्रार दाखल करु शकतो. सुरुवातीला ही प्रक्रिया दहा लाखापेक्षा जास्त फसवणूक झालेल्या गुन्ह्यासाठी असणार आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर तक्रारदार तीन दिवसांच्या आता पोलीस ठाण्यात जाऊन झिरो एफआयआर नियमित एफआयआरमध्ये परिवर्तित करण्यात येणार आहे. नवीन प्रणाली तीन मुख्य संस्थांच्या माध्यमातून तयार केली आहे. भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र (I4C), दिल्ली पोलिसांची ई-एफआयआर प्रणाली आणि राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरो (NCRB) या तीन संस्थांनी मिळून हे नेटवर्क तयार केले आहे. याअंतर्गत तक्रार प्राप्त झाल्यावर ती आपोआप दिल्लीच्या ई-क्राइम पोलीस स्टेशनला पाठवली जाईल. त्यानंतर ती स्थानिक सायबर पोलिस स्टेशनमध्ये हस्तांतरित केले जाईल. ही संपूर्ण प्रक्रिया भारतीय नागरी सुरक्षा संहितेच्या कलम 173 (1) आणि 1(ii) अंतर्गत राबविण्यात आली

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून श्री क्षेत्र परळी वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास कामांचा आढावा

## श्रीक्षेत्र परळी वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकासासाठी सर्वोतोपरी सहकार्य- उपमुख्यमंत्री अजित पवार

परळी जि. बीड दि.१९ : श्रीक्षेत्र परळी वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करणार असल्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी आज सांगितले. विकास आराखड्यातील कामांसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही मात्र कामे दर्जेदार व गुणवत्तापूर्ण झाली पाहिजेत असे निर्देश त्यांनी यावेळी दिले. उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी आज परळी येथे प्रभु वैद्यनाथचे दर्शन घेतले. त्यानंतर परळी येथील शासकीय विश्रामगृहातील सभागृहात त्यांनी श्रीक्षेत्र परळी वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखड्या अंतर्गत सुरू असलेल्या कामांचा आढावा घेतला. यावेळी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, आमदार विक्रम काळे, आमदार धनंजय मुंढे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव राजेश देशमुख आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी श्री क्षेत्र परळी येथील तीर्थक्षेत्र विकास आराखड्यामध्ये 92 कामांना नव्याने प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याचे सांगितले. यावेळी आराखड्यानुसार करण्यात येणाऱ्या कामांचे सादरीकरण करण्यात आले. तीर्थक्षेत्र विकास आराखड्यात 286.68 कोटीच्या विविध 92 कामांना मान्यता दिल्याचे त्यांनी सांगितले.



दर्शन मंडपाचे काम, परिसर सुधारणा, मंदिरा भोवती दगडी फरशी, वास्तुशिल्प प्रवेशद्वार, अंतर्गत विद्युतीकरण, सौर दिवे बसविणे, उद्यान विकसित करणे, संरक्षण भिंतीचे बांधकाम, वाहनतळ यासह सुरू असलेल्या विकास कामांबाबत मुख्य वास्तुविशारद कृष्णकुमार बांगड यांनी माहिती दिली. उपमुख्यमंत्री श्री.पवार म्हणाले, श्रीक्षेत्र परळी वैद्यनाथ हे बारा ज्योतिर्लिंगापैकी एक आहे. प्रभु वैद्यनाथाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी विकास आराखड्यातील कामेही दर्जेदार होणे अत्यंत आवश्यक आहे. कामाच्या गुणवत्तेबाबत प्रत्येकाने बारकाईने लक्ष घालणे आवश्यक आहे. मंदिर परिसरातील स्वच्छता, निटनेटके पणा, सर्व सोई सुविधांयुक्त दर्शन मंडप, तसेच तीर्थक्षेत्र बालाजी, शिर्डी तसेच पंढरपूरच्या धर्तीवर भविष्यात भाविकांना सर्व सोईसुविधा देण्यासाठी राज्य शासनाकडून यासाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही. राज्य शासन सर्वोतोपरी सहकार्य करेल, असे त्यांनी सांगितले. मंदिराच्या मागील बाजूच्या जागेवर लाईट आणि साऊंड शो करण्यात येणार आहे. लेझर शो करताना किती वेळ शो असेल, त्यामध्ये भाविकांना कोणत्या बाबी दाखविल्या जातील यासह देण्यात येणाऱ्या सेवा सुविधा दर्जेदार असायला हव्यात असे त्यांनी आवर्जून सांगितले.

यावेळी उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, तहसिलदार व्यंकटेश मुंढे, नगर परिषदेचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे आदी विकसीत होते.



बीड: लातूरचे खासदार मा. श्री. डॉ. शिवाजीराव काळगे साहेब सोमवारी बीड येथे आले असता त्यांनी त्यांचे मित्र डॉ.माधवराव सानप सर यांच्या निवासस्थानी व मेडिकेअर हार्ट हॉस्पिटल येथे सदिच्छा भेट दिली असता त्यांचा डॉ. माधव सानप सर,डॉ. सुनील बोबडे सर, डॉ. अजित घोडके सर, डॉ.उमेश घायतीडक सर, नवनाथ शेरकर ,तेजमल राऊत व Aclap संघटनेचे सचिव तथा पूजा लॅब चे सुरेश पिंपळे यांनी सत्कार केला.

## कै.देऊबाई धोंडिबा पांचाळ यांचे निधन



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : लोहा तालुक्यातील जोमेगाव येथील ज्येष्ठ महिला नागरिक कै.देऊबाई धोंडिबा पांचाळ वय वर्षे १०१ यांचे वृद्धापकाळाने दि.१९-मे रोजी पहाटे ३ वाजता निधन झाले असून त्यांच्या पार्थिवावर दि.१९-मे रोजी दुपारी २ वाजता जोमेगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.कै.देऊबाई धोंडिबा पांचाळ त्यांच्या पश्चात एक मुलगा सहा मुली नातू पणतू असा मोठा परिवार आहे. जोमेगाव येथील आदर्श पोलीस पाटील मारोती धोंडीबा पांचाळ यांच्या त्या मातोश्री होत.

# शंभूराजे जयंतीनिमित्त जागर

## प्रतिष्ठानकडून रक्तदान शिबिर संपन्न..

बीड प्रतिनिधी अंकुश गवळी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त जागर प्रतिष्ठान बीड विभागाच्या वतीने माजलगाव तालुक्यातील सिमरी पारगाव आणि धारूर तालुक्यातील जहागीर मोहा या ठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते , धर्मवीर



छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानाचे स्मरण ठेवून संघटनेचे शिलेदारांनी हा स्तुत्य उपक्रम राबवला होता तरी या शिबिरात 85 हुन अधिक रक्तदात्यांनी रक्तदान केलेले आहे... तसेच जाहागीर मोहा येथे दोन दिवसीय जन्मोत्सव सोहळ्याचे सुद्धा आयोजन करण्यात आलेले होते त्यात कीर्तन आणि व्याख्यान यांचा समावेश होता .

# गेवराई नगर परिषदेकडून १८ कोटींच्या विकास कामांचा शुभारंभ

## उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्याकडून पी.टी.आर.चे वाटप

गेवराई, जिल्हा बीड :- गेवराई नगर परिषदेच्या माध्यमातून तब्बल 18 कोटी रुपये किंमतीच्या विविध विकासकामांचा शुभारंभ तसेच अतिक्रमण धारकांना हक्काच्या पी.टी.आर. (Property Tax Receipt) चे वाटप उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते संपन्न झाले.कार्यक्रमास पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, आमदार धनंजय मुंडे, आमदार विजय सिंह पंडित. आमदार सर्वश्री सतीष चव्हाण, विक्रम काळे, माजी आमदार अमरसिंह पंडीत, कल्याण आखाडे, प्रा.सुनील मगरे, राजेश्वर चव्हाण, शंकर देशमुख, स्वप्नील गलधर यांच्यासह अनेक मान्यवर, नगरसेवक, प्रशासनातील



अधिकारी व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमाचा उद्देश शहरी भागात भौतिक सुविधा वाढवणे, अनधिकृत बांधकामांना अधिकृत दर्जा देणे व नागरी विकासाला गती देणे हा आहे. कार्यक्रमादरम्यान अजित पवार यांनी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध असल्याचे सांगत, भविष्यात आणखी निधी देण्याचे संकेत दिले. या विकास योजनेत रस्ते, नाल्या, पाणीपुरवठा, स्ट्रीट लाईट आणि इतर नागरी सुविधा यांचा समावेश आहे. हा उपक्रम गेवराई शहराच्या विकासासाठी मैलाचा दगड ठरणार आहे. 18 कोटी रुपये किंमतीच्या विविध विकास कामांमध्ये शिवाई नगरी येथे सिंमेट रस्ता व नाली बांधकाम, अहिल्यानगर येथे सिंमेट रस्ता व नाली बांधकाम, सेवालाल नगर येथे सिंमेट रस्ता व डोम बांधकाम, सावता नगर येथे सिंमेट रस्ता व नाली बांधकाम, इस्लामपूरा भागातील कब्रस्थान संरक्षक भिंत बांधकाम, ताकडगाव रोड येथे सिंमेट रस्ता व नाली बांधकाम, कृष्णाई नगर येथे सिंमेट रस्ता व नाली बांधकाम, पंचायत समितीलगत व्यापारी संकुल बांधकाम, छत्रपती संभाजी महाराज चौक सुशोभिकरण, जुने गेवराई शहर सिंमेट रस्ता व नाली बांधकाम, कोरबू मोहोल्ला येथे सिंमेट रस्ता व नाली बांधकाम, विरशैव समाज स्मशानभूमीचे बांधकाम, तय्यब नगर येथे सिंमेट रस्ता व नाली बांधकाम, संजयनगर येथे सिंमेट रस्ता व नाली बांधकाम, संघमित्र नगर येथे बौद्ध विहार बांधकाम, वीर लहुजी नगर येथे आरोग्य केंद्र बांधकाम, जलशुद्धीकरण केंद्र येथे एक्सप्रेस फिडरची जोडणी, गेवराई शहर येथे शादीखाना बांधकाम करणे इत्यादी कामांचा समावेश आहे.

*****

# खा.सोनवणेंनी मांडल्या शेतकऱ्यांच्या व्यथा; पीक कर्जाची मर्यादा वाढविण्याची बैठकीत मागणी

## जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत खा.सोनवणे बनले शेतकऱ्यांचा आवाज

बीड: जिल्ह्यातील बहूतेक भागात शेती खरडा-बर्डाची आहे. यात कधी अस्मानी तर कधी सुल्तानी संकट शेतकऱ्यांच्या मागे उभाच असतात. अशावेळी शेतकऱ्यांना पीककर्ज आवश्यक असते. आतापर्यंत शेतकऱ्यांना ३ लाखापर्यंत पीककर्ज दिले जात असून त्याची मर्यादा वाढवून ता ५ लाखापर्यंत करावे, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत केली. जिल्हा नियोजन समितीची बैठक दि.१९ मे २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन विभागाच्या सभागृहात संपन्न झाली. यावेळी पालकमंत्री ना. अजित पवार, मंत्री ना.पंकजा मुंडे, आ.प्रकाश सोळंके, आ.सुरेश धस, आ.धनंजय मुंडे, आ.संदीप क्षीरसागर, आ.विजयसिंह पंडीत, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने, अधिकारी-कर्मचारी यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्ह्यातील महत्वाच्या विषयाला हात घालत बीडसाठी रेल्वे हा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. अहिल्यानगर ते परळी रेल्वेमार्गाचे काम सुरू आहे. परंतु मध्यल्या काळात रेल्वेचे रूळ अंथरण्याच्या कामासोबत विद्यूत जोडणीचे काम त्याच वेगाने होणे आवश्यक होते. विद्युत जोडणीस होत असलेल्या विलंबामुळे रेल्वेची हायस्पीड चाचणी होऊनही रेल्वे बीडपर्यंत येऊ शकलेली नाही. दरम्यान, रेल्वे विभागातील ओव्हर ब्रिज, अंडर ब्रिज तयार करीत असताना त्यात अडचणी येतात. त्या सोडविण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. पालकमंत्री अजित पवार यांनीही यात लक्ष घातल्यास अनेक अडचणी सुटून रेल्वे कामाला हायस्पीड गती मिळेल, येणाऱ्या काळात बीडला रेल्वे येईल आणि जिल्हयाच्या विकासाला चालना मिळेल, असेही खा.सोनवणे म्हणाले. खा.सोनवणेंनी शब्द टाकला अन् दादांकडून होकार अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेमार्गाचे रात्रंदिवस काम सुरू आहे परंतु याचसोबत



धाराशिव-बीड-संभाजीनगर रेल्वेची मागणी देखील पुढे आलेली आहे. आपण केंद्रात यासाठी आवश्यक पाठपुरावा करत आहोत, असे सांगत खा.सोनवणे यांनी धाराशिव-बीड-संभाजीनगर रेल्वेमार्ग प्रकल्पासाठी राज्यशासनाने अर्धा हिस्सा देण्यात यावा, अशी महत्वपुर्ण मागणीही उपमुख्यमंत्री अजीत पवार यांच्याकडे केली. यावेळी उपमुख्यमंत्री पवार यांनी देखील ही मागणी मान्य केली. झेडपीच्या अतिरिक्त कारभाराच्या विषयावर चर्चा जिल्हा परिषद प्रशासनात काही कर्मचारी प्रशासकिय बदल्यानंतरही अतिरिक्त कामकाजाच्या नावाखाली पुन्हा त्याच ठिकाणी पदभार घेतात. मागील दहा वर्षांपासून जिल्हा परिषदेत जवळपास ७७ कर्मचारी असेच काम आहेत. यामुळे अशा कर्मचाऱ्यांकडे असलेला पदभार काढून त्यांना मुळे ठिकाणी पाठवावे, अशी भुमिकाही खा.बजरंग सोनवणे यांनी मांडली. यावेळी या विषयावर अधिकाऱ्यांनी चर्चा करून कार्यवाही करू, असे सांगितले.

### बोगस पिकविम्यावरही उठवला आवाज

बीड जिल्ह्यात मागील काळात बोगस पीक विमा भरून परळी भागातील लोकांनी कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे. याप्रकरणी तातडीने चौकशी करून दोषींवर कारवाई करावी अशी मागणीही खा.सोनवणे यांनी केली.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार २० मे २०२५
https://lokaarambh.com



संपादकीय

## जमिनीचा गैरव्यवहार आला समोर

पुण्यातील कोंढवा भागातील सुमारे ३० एकर राखीव वनजमिनीच्या प्रकरणाकडे पाहायला हवे. पंचवीस वर्षांपूर्वीच्या या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे, तत्कालीन भाजप शिवसेना युती सरकारमधील महसूलमंत्री नारायण राणे यांच्यासह तत्कालीन विभागीय आयुक्त आणि उपवनसंरक्षक अशा बड्यांच्या संगनमनताने ही वनजमीन नसल्याची बनावट कागदपत्रे सादर करून झालेला काही अब्ज रुपयांच्या जमिनीचा गैरव्यवहार समोर आला आहे. धोरणकर्ते मंत्री, बडे अधिकारी आणि बांधकाम व्यावसायिक हे राज्यातील जंगलांचे भक्षक बनत असल्याचे या निकालातून समोर आले आहे. नवे सरन्यायाधीश न्या. भूषण गवई यांनी पदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर दिलेला हा पहिलाच निकाल. मात्र, पुण्यातला हा प्रकार म्हणजे हिमनगाचे टोक असावे, असे राज्यातील विविध शहरांच्या परिसरात उभी राहणारी सिमेंटची जंगले पाहून म्हणावे लागेल. त्यामुळेच न्यायालयाने नियुक्त केलेल्या उच्चाधिकार समितीने या प्रकरणातील संबंधितांवर कारवाईची शिफारस केली. सोबतच महसूल विभागाच्या ताब्यात वनीकरणासाठी आरक्षित असलेली जमीन खासगी व्यक्ती किंवा संस्थांना वनीकरणाव्यतिरिक्त अन्य काही कारणांसाठी देण्यात आली आहे का, याची तपासणी करण्यासाठी विशेष तपास पथकाच्या स्थापनेचे आणि अशा जमिनींचा ताबा घेऊन ती वन विभागाकडे सुपूर्द करण्याचे; तसेच असे काही प्रकार आढळल्यास त्याची किंमत संबंधित जमीनधारकांकडून वसूल करण्याचे आणि ती रक्कम वनीकरणासाठी वापरण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. पुण्यातील कोंढवा बुद्रुक परिसरातील ही जागा राखीव वनक्षेत्र म्हणून अधिसूचित करण्यात आली होती. राणे यांनी ही संपूर्ण जमीन मालक चव्हाण यांना देण्याचा निर्णय दिला. वर्षभरातच तत्कालीन विभागीय आयुक्तांनी ही जागा एका गृहनिर्माण सोसायटीला निवासी उद्देशासाठी विकण्याची परवानगीही मालकास दिली; लगोलग जिल्हाधिकाऱ्यांनीही या जागेचा वापर बिगरशेती उद्देशाने, म्हणजेच निवासी बांधकामासाठीही परवानगी दिली. भरीस भर म्हणून तत्कालीन उपवनसंरक्षकांनीही या सगळ्या उद्योगासाठी ङ्गना हरकत प्रमाणपत्रफ देऊन टाकले. पुढे महापालिकेने बांधकाम परवाना दिला आणि वन व पर्यावरण मंत्रालयानेही या निवासी-व्यावसायिक बांधकामासाठी पर्यावरण मान्यता दिली. त्यामुळे वन संरक्षण कायद्याचे उल्लंघन झाल्याची याचिका दाखल करण्यात आली होती. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या केंद्रीय उच्चाधिकार समितीने या जमिनीच्या विक्रीला दिलेली परवानगी रद्द करण्याची शिफारस केली. तत्कालीन महसूलमंत्री, विभागीय आयुक्त आणि उपवनसंरक्षकांवर फौजदारी कारवाईची शिफारसही केली. महाराष्ट्र हे औद्योगिकरण व नागरीकरणामध्ये देशातील आघाडीवरचे राज्य आहे. मात्र, याच नागरीकरणाच्या रेट्यात राज्यातील वन जमिनींवर अतिक्रमण होत आहे. राज्यातील वनाच्छादनाचे प्रमाण सुमारे २० टक्के असून त्यात राज्याचा देशात २८वा क्रमांक लागतो. विशेषतः पुणे, मुंबई आणि नाशिक परिसरात शहरांच्या विस्तारामध्ये वन क्षेत्र झपाट्याने कमी होत आहे. अनेक जागा कागदावर ङ्गवन क्षेत्रफ असून, प्रत्यक्षात तेथे सिमेंटची जंगले उभी राहिल्याची अनेक प्रकरणे असू शकतात. मुंबईत मेट्रो कारशेडसाठी जंगलतोडीला नागरिकांनी तीव्र विरोध केला होता. वन क्षेत्र घटण्याचे परिणाम प्रदूषण, हवामानबदल, पावसाचे बदलते प्रमाण आणि जैवविविधता धोक्यात येण्यातून समोर येत आहेत. अनेक शहरांमध्ये बिबट्यासारखी श्वापदे मानवी वस्तीत येण्याचे प्रकार, हा वनक्षेत्र घटल्याचाच दुष्परिणाम आहे. पुण्यातील प्रकरण जागरूक नागरिकांमुळे उघडकीस आले आणि सर्वोच्च न्यायालयात अनेक वर्षे लढा दिल्याने हे वन क्षेत्र वाचले; मात्र अनेकांच्या नशिबी हा न्याय असेलच, अशी हमी देणारी व्यवस्था नाही. अनेक प्रकरणांमध्ये अशाच जमिनींवर अतिक्रमणे होतात, वैध-अवैध इमारती-मॉल उभे राहतात. संबंधित बांधकाम व्यावसायिक इमारती बांधून आणि त्यांची विक्री करून हात वर करतात, अधिकारी बदली किंवा निवृत्त होऊन निघून जातात आणि मंत्री पदावर येतात जातात. वनखात्याकडे मनुष्यबळ अपुरे असल्याने वन जमिनीच्या संरक्षणाची जबाबदारी महसूल खात्याकडे आली आहे. या खात्यातील काही प्रवृत्ती कायद्यातून पळवाटा काढून किंवा संपूर्ण कायदाच वाकवून या जंगलांनाच भक्ष्य करीत आहेत.

# देण्यातील आनंदच मुळी शब्दांच्या पलिकडला

समता, समानता वगैरे गोष्टी अनेकजण मोठमोठ्याने बोलत असतात खरे; पण निसर्गाने मात्र जिकडे तिकडे विविधता, वेगळेपणा, विशेषतः निर्माण करुन ठेवली आहे हेच वास्तव आहे. हाताचं एक बोटही दुसऱ्या बोटासारखं नसतं. एकाच आईची लेकरेही एकसारखी नसतात. त्यांच्यात निसर्गदत्त वेगळेपणा असतोच असतो. काही ठिकाणी निसर्ग, नियती खिरापत वाटते, तर काही ठिकाणी अन्याय करते हेही तेवढेच खरे आहे. आपल्याच भारत देशातील काही राज्ये, काही जिल्हे, काही तालुके संपन्न, सुखी, निसर्गसंपदेने परिपूर्ण तर काही दुष्काळी, रखरखीत, पाऊसपाण्यापासून दुरावलेले, स्थानिक प्रशासन तेथील रहिवासी-नागरिकांना मूलभुत सोयी सुविधा पुरवण्यातही दुबळे असेही पाहायला मिळते. अशावेळी त्या उपेक्षितांना वाढीव, ज्यादा, अतिरिक्त संधी देऊन मुख्य प्रवाहात आणण्याचे काम सरकारांनी करायचे असते. कधी कधी सरकारी प्रयत्नही अपुरे पडतात. मग पुढे सरसावतात त्या सेवाभावी, स्वयंसेवी, बिगर शासकीय (म्हणजेच एन जी ओ प्रकारच्या) सामाजिक संस्था. त्यात गेली दहा वर्षे आपले पुरेपुर योगदान देण्यात 'जॉय ऑफ गिव्हींग' ही संस्था आघाडीवर आहे.

श्री. गणेश हिरवे यांनी आपल्या निवडक सहृदयी मित्रांच्या सहकार्याने सुरु केलेली 'जॉय ऑफ गिव्हींग' ही संस्था जरी मुंबईच्या उपनगरात असली तरी तिचे कार्यक्षेत्र मात्र व्यापक आहे. मुंबई शहर, मुंबई उपनगर या जिल्ह्यांसह शेजारच्या ठाणे, रायगड, पालघर अशा ठिकाणच्या वंचित, दुर्लक्षित, उपेक्षित, मदतीपासून दूर असलेल्या घटकांपर्यंत जाऊन त्यांना सहकार्य करणे, त्यांच्या पाठीवर मायेचा, प्रेमाचा, आस्थेचा, आपुलकीचा हात फिरवणे, त्यांच्यातील गुणवंतांना सन्मानित करणे हे या संस्थेचे व्यवच्छेदक लक्षण आहे. दुर्गम भागातील पाडे, आदिवासी वस्त्या, शाळा, वसतिगृहे येथपर्यंत जाऊन त्यांना मदत करण्यासाठी फारच कमी लोक पुढे येतात. वास्तविक पाहता शहरी भागात अनेक सेवाभावी संस्था, क्लब्ज, मंडळे, परिषदा कार्यरत असतात व त्यांच्या परीने ते शहरी भागात विविध प्रकारची सामाजिक कामेही करीत असतात. खरी गरज आहे ती दुर्गम, अविकसित, अप्रगत भागातील नागरिक, विद्यार्थी, गरजू यांना मदत करण्याची. तेथपर्यंत जाण्याचे मार्ग खडतर



असतात, असुंदर असतात, घाम गाळायला लावणारे असतात. शहरी चकचकाटाला सरावलेले लोक तिकडे जाण्याचा विचारही अनेकदा मनात आणत नाहीत. तो विचार 'जॉय ऑफ गिव्हींग' ही संस्था करते आणि प्रत्यक्षात उतरवते. मी स्वतः स्नेहज्योती निवासी अंध विद्यालय - घराडी, जिल्हा रत्नागिरी; कुष्ठरोग निवारण समिती केंद्र - शांतीवन, नेरे, तालुका पनवेल या व यासारख्या अनेक संस्थांशी कामाच्या माध्यमांतून जोडला गेलेला असल्याने व पत्रकार म्हणून त्यांच्या अडचणींना, समस्यांना, उपेक्षेला बातमी-लेख स्वरुपात मांडत गेलेला असल्याने यातील वास्तव जाणून आहे.

या प्रकारच्या कामांसाठी संघटन शक्ती लागते, सेवाभावी वृत्ती लागते, तळागाळात उतरुन अहंपणा त्यागत कार्य करण्याची मानसिकता लागते. ते सारे 'जॉय ऑफ गिव्हींग'च्या साऱ्या शिलेदारांकडे आहे. एवढेच नव्हे, तर त्यांचे कुटुंबियही त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे ठाकले आहेत. म्हणूनच ते दहा वर्षांच्या कालावधीत समाजाच्या विविध उपेक्षित, वंचित घटकांच्या कामी येऊ शकले. हे काम करण्यासाठी अर्थशक्तीसुध्दा लागते. अनेकदा आपले काम पाहुनच मदतीचे अनेक हात पुढे सरसावतात. ही मदत वाढली पाहिजे, मिळणारी आर्थिक ताकद वाढली पाहिजे. जिथे दानी मंडळी स्वतः त्यांच्या कामाच्या व्यापामुळे पोहचू शकत नाही तिथे त्यांनी दिलेली मदत मात्र अशा संस्थांच्या माध्यमातून नक्कीच पोहचू शकते. यासाठी समाजातील आर्थिकदृष्ट्या सक्षम मंडळींनी आणखी पुढे यायला हवे आणि चांगले काम करणाऱ्यांची पाठराखण करायला हवी. 'जॉय ऑफ गिव्हींग'च्या वर्धापन दिनानिमित्त त्यांना खूप खूप शुभेच्छा आणि याहीपुढे त्यांच्याकडून अशीच जनसेवेची कामे निरंतर व्हावीत म्हणून समाजाने त्यांच्या पाठीशी सर्वार्थाने उभ राहावे हीच सदिच्छा!

**-राजेंद्र गोपीनाथ घरत,**
उपसंपादक, दै. आपलं नवे शहर,

# आंदबोरी येथील शेतकऱ्याच्या वहीत शेतातुन दोन पांदण रस्ते दाखवल्याची शेतकऱ्याची तक्रार

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड-किनवट : तालुक्यातील आंदबोरी येथील शेत सर्वे गट नंबर १ मध्ये शामराव केशवराव सूर्यवंशी यांच्या शेतामध्ये पूर्ववत एक पांदण रस्ता असूनही दुसरा पांदण रस्ता आहे भूमीअभिलेख कार्यालयाकडून नकाशात दाखवण्यात येत आहे.तो चुकीचा असून आंदबोरी (चि) ते लिंगधरी जाणारा वहिवाट रस्ता बंद करून आम्हाला मानसिक त्रास व मालमतेची नुकसानाची प्रत्यक्ष पाहणी व मोजणी करुण न्याय मिळवून देण्याची मागणी शेतकरी शामराव केशवराव सूर्यवंशी यांनी सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. सविस्तर वृत्त असे की मौजे आंदबोरी (चि) शिवारातील एकत्रीकरण (तुकडेबंदी) पुर्वीचा स.नं. ०१ व सध्याचा गट नं.०१ असा असून या गट नं.१ मधुन पश्चिम दिशेस जूना पांदन रस्ता आहे. तो सध्या चालू आहे. भुमी अभिलेख विभागाकडील नकाशा, पट्टा बुक वर सदर रस्त्याची नोंद आहे. व त्याचे पोटखराव ०-२१ आर आहे.संबंधित शेतमालक श्यामराव केशवराव सूर्यवंशी यांच्या शेताच्या पुर्वेस जुना सर्व्हे नंबर २२ सध्याचे गट क्र. २६,२७, २८ असे असून त्यामधुन सूध्दा गट नंबर २६ च्या पश्चिम बाजूने जूना गाडी रस्ता आहे. परंतु, सदर रस्ता श्यामराव सूर्यवंशी यांच्या शेतातून काढण्यात आलेला असल्याने त्यांच्या शेतातुन दोन पांदन रस्ते आज रोजी चालू आहेत. भुमी अभिलेख विभागाकडील जुन्या नकाशा पट्टा बुक, प्रतिबुक, प्रमाणे सर्व्हे नंबर २२ सध्याचे गट नंबर २६, २७ व २८ मधुन ०-२१ आर रस्त्याची नोंद आहे. ते दक्षेत्र पोटखराव गाडी मार्ग ०-२१ आर अशी पट्टाबुक व प्रतिबुक गांव नकाशा यात नोंद आहे. त्यामुळे भूमी अभिलेख कडील जून्या अभिलेखाची पडताळणी करुन जून्या अभिलेख नुसार रस्ता पुर्ववत करावा व माझ्या शेतामधुन जाणारा रस्ता बंद करावा भूमी अभिलेख कार्यालयाकडे लेखी निवेदन देऊन १५ दिवसाचा कालावधी होवुन सूध्दा त्यावर कोणतीच कार्यवाही झाली नसल्याची तक्रार शेतकऱ्याने दिलेल्या निवेदनामध्ये म्हटले आहे.

# बीडच्या विकासासाठी वाढीव निधी -उपमुख्यमंत्री अजित पवार जिल्हा नियोजनाचा ५७५ कोटींचा आराखडा सादर

बीड, दि. 19 (जि.मा.का.) बीड जिल्हयाच्या विकासासाठी मी स्वत: अर्थमंत्री म्हणून अधिकाधिक निधी देत आहे अशी माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज दिली. जिह्ला नियोजन समितीच्या बैठकीनंतर ते पत्रकारांशी बोलत होते. आज झालेल्या बैठकीत जिह्लयाचा 575 कोटी रुपयांचा (सर्वसाधारण) आराखडा सादर करण्यात आला.

या बैठकीस पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, खा. बजरंग सोनवणे,उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव राजेश देशमुख, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, समितीचे सदस्य सचिव तथा जिह्लाधिकारी विवेक जॉन्सन, जिह्ला परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने तसेच पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांची प्रमुख तसेच आमदार धनंजय मुंडे उपस्थिती होती.,

समिती प्रतिनिधींमध्ये आमदार विक्रम काळे, आमदार सतीश चव्हाण, आमदार सुरेश धस, आमदार प्रकाश सोळंके, आमदार नमिता मुंदडा, आमदार विजयसिंह पंडित आदींनी या बैठकीत सहभाग घेतला.

वर्ष 2024-25 चा आराखडा 484 कोटी रुपयांचा होता ही संपूर्ण रक्कम 100 टक्के खर्च झाली आहे. याचा आढावा देखील आजच्या बैठकीत घेण्यात आला. यावेळी जिह्लाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पुढील वर्षीच्या प्रस्तावित आराखडयाबाबत सादरीकरण केले.

मागील बैठकीतील इतिवृत्तावर या बैठकीत चर्चा होवून त्यास मंजुरी देण्यात आली.

गुणवत्तापूर्ण कामे आणि पारदर्शी कामांवर भर द्या व दिलेली कामे वेळेत पूर्ण करा असे सांगून श्री पवार यावेळी म्हणाले की यापुढील काळात निधी जिह्लयाला थेट वर्ग न करता तो मुंबईहुन झालेल्या कामाच्या प्रमाणात जारी करण्याचे धोरण अंमलात आणले जाणार आहे.

गतवर्षी 484 कोटींचा आराखडा होता परंतू प्रत्याक्षात 446.30 कोटी इतका अंतिम आराखडा मंजूर झाला होता यात वर्ष 2025-26 करिता 128 कोटी रुपयांची वाढ करुन तो 575 कोटीच करण्यात आला आहे. 2022-23 च्या तुलनेत यंदाचा आराखडा दुप्पट आहे हे उल्लेखनीय.

नियोजन समितीमधील कोणतेही काम 15 लाख रुपयांपेक्ष कमी असू नये तसेच कामाचे तुकडे पाडण्यात येवू नयेत प्रस्तावित जागेची मालकी तसेच त्याचे अक्षांश-रेखांश प्रस्तावित सामिल हवे अशा अटी यावर्षी घालण्यात आलेल्या आहेत.

कामाच्या ठिकाणी कामाच्या माहितीचे फलक अनिवार्य करण्यात आले असून कामांना प्रशासकीय मंजूरी प्रदान झाल्यावर 15 दिवसात त्याची निविदा प्रक्रिया करणे



आवश्यक असेल अशा सर्वसाधारण सूचना नियोजन विभागाने यावर्षी जारी केल्या आहे.

वर्ष 2025-26 साठी ग्रामीण विकास अंतर्गत जनसूविधा व नागरी विकास 21 कोटी, जिह्ला आरोग्य अधिकारी 18.2 कोटी, जिह्ला शल्य चिकित्सक 28.50 कोटी, स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय 20 कोटी, प्राथमिक शिक्षण 28. 50 कोटी, जलसंधारण 36 कोटी, महिला व बाल कल्याण 18. 39 कोटी, ग्रामीण रस्ते 105 कोटी रुपये आदीप्रमाणे नियोजन आहे.

पशुधन विकासासाठी 22.28 कोटींचा आराखडा आहे सोबतच राज्य शासन, सी.एस.आर. आणि नियोजन निधिमधून वेगळा दुग्धोत्पादन अर्थात धवल क्रांती योजना राबविण्याचा प्रस्ताव पशुधन विकास तथा पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी दिला. तो या बैठकीत स्विकारण्यात आला.

यासोबत नागरी क्षेत्र विकास 63. 66 कोटी, उर्जा विकास 31 कोटी, पोलीस व तुरुंग आस्थापना 16.35 कोटी, महसूल व आपत्ती व्यवस्थापन 7. 43 कोटी, क्रींडागण विकास 4.20 कोटी रुपय असे नियोजन या आराखडयात आहे. बैठकीच्या आयोजनासाठी जिह्ला नियोजन अधिकारी डॉ. सुधाकर चिंचाणे व त्यांचे सहकारी यांनी परिश्रम घेतले निवासी उपजिह्लाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले

# किनवटच्या एसव्हीएम शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

किनवट :-येथील सरस्वती विद्या मंदिर शाळेतील इयत्ता दहावी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सोमवारी दि.१९ मे-रोजी शाळेच्या सभागृहात पालकांसह गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरस्वती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष व्यंकटराव नेम्मानीवार होते.व्यासपीठावर शाळेचे मुख्याध्यापक व सचिव कृष्णकुमार नेम्मानीवार,कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा.डॉ.राजीव राठोड,पर्यवेक्षक संजय चव्हाण,सहशिक्षक गजानन भुरेवार,पत्रकार आशिष देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.प्रारंभी गुणानुक्रमे प्रथम, द्वितीय तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांसह विशेष प्रावीण्यासह उत्तीर्ण झालेल्या गुणवंतांचा त्यांच्या पालकांसह शाल,श्रीफळ व स्मृतीचिन्ह देवून सत्कार करण्यात आला.प्रास्ताविकात पर्यवेक्षक संजय चव्हाण यांनी शाळेच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेतला.याप्रसंगी मुख्याध्यापक कृष्णकुमार नेम्मानीवार,राजीव राठोड, तृप्ती बावणे,अक्षरा देशपांडे,मानसी रामतीर्थकर,गौरी नेम्मानीवार,नीरजा भटकर,संगमेश्वरी चव्हाण,उदयकिरण पानपत्ते,समृद्धी भालके,पालक प्रतिनिधी आशिष देशपांडे यांनीही मनोगत व्यक्त केले.अध्यक्षीय समारोपात व्यंकटराव नेम्मानीवार यांनी शाळेच्या यशस्वी वाटचालीबद्दल समाधान व्यक्त करून गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. सूत्रसंचालन राधिका तिरमनवार यांनी केले.सहशिक्षक भारत हातमोडे यांनी आभार मानले. कार्यक्रमास सहशिक्षिका संध्या दासरवार, प्रियंका बनगिनवार,संध्या सिरमनवार,सुरेखा चनमनवार,सहशिक्षक विजय सातुरवार,सुरेश ,चंदन एंड्रलवार आदींची उपस्थिती होती.

## ‘ऑपरेशन सिंधू’च्या यशानंतर भारतीय सैन्याचा गौरव; वाशिम येथे भव्य तिरंगा यात्रा



प्रतिनिधी | वाशिम आज दिनांक १८ मे २०२५ रोजी भारतीय सैन्याच्या ‘ऑपरेशन सिंधू’ या मोहिमेच्या यशस्वी पूर्णतेनंतर भारतीय जवानांचा सन्मान करण्यासाठी वाशिम येथे भव्य तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले. या यात्रेत स्थानिक नागरिक, समाजसेवक, राजकीय पदाधिकारी, विद्यार्थी व विविध संघटनांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. हातात तिरंगा आणि राष्ट्रभक्तीचा जयघोष देत उपस्थितांनी देशभक्तीचा उत्साह व्यक्त केला. यात्रेत सहभागी झालेल्यांनी भारतीय सैन्याच्या पराक्रमाचा गौरव करत, त्यांच्या योगदानासाठी कृतज्ञता व्यक्त केली. वाशिम जिल्ह्यातील नागरिकांनी ही यात्रा अत्यंत शिस्तबद्ध व प्रेरणादायी पद्धतीने पार पाडली.

## गुणवंत विद्यार्थी लोढा यांचा सत्कार



प्रतिनिधी प्रशांत कांबळे शिवनेरी महाविद्यालय, पालम येथे गुणवंत विद्यार्थी लोढा यांचा संस्थेच्यावतीने सत्कार करण्यात आला. त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उज्वल कामगिरीची दखल घेत ही गौरवमय संधी महाविद्यालयात आयोजीत करण्यात आली होती. या सत्कार समारंभास संस्थेचे सचिव तसेच महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी लोढा यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या वतीने उत्साहात पार पडले.

## तेजस्वी निवाते यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार



गणेश हिरवे मुंबई प्रतिनिधी बोरिवली पूर्व येथील अभिनव शिक्षण मंदिर येथील शिक्षिका तेजस्वी निवाते यांना नुकताच जॉय ऑफ गिविंग संस्थेच्या वतीने आदर्श शिक्षिका पुरस्कार जाहीर करण्यात आला असून येत्या ७ जून रोजी अस्मिता भवन येथे जॉय वर्धापन दिन कार्यक्रमात त्यांना उपस्थित प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते तो प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष गणेश हिरवे यांनी दिली.शिक्षिका तेजस्वी २०१० पासून या क्षेत्रात कार्यरत असून कर्तव्यदक्ष आणि उपक्रमशील म्हणून ओळखल्या जातात. प्रत्येक पाठामध्ये नाविन्यता कशी आणता येईल आणि डिजिटल युगाशी कसा कसा संबंध लावता येईल या साठी त्या प्रयत्नशील असतात. तसेच संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी पाड्यातील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून तो टिकवून ठेवण्यासाठी त्यांनी अनेक उपक्रम केले आहेत.अनेकदा विद्यार्थ्यांना विविध ठिकाणी घेऊन जाऊन प्रत्यक्ष अनुभव देतात. अशा मुलांशी एकरूप होऊन कार्य करणाऱ्या तेजस्वी यांचा अभिमान असल्याचे हिरवे सांगतात.पुरस्कार जाहीर झाल्याने शाळेतील शिक्षक शिक्षकेतर, संस्थेचे पदाधिकारी, विद्यार्थी, पालक यांनी निवाते टीचर यांचे अभिनंदन केले असून भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# शरदचंद्रजी पवार विद्यालयाचा उज्ज्वल यश! एसएससी बोर्ड निकालात ८३.०९% निकाल

प्रतिनिधी मूर्ति (ता. घनसावंगी, जि. जालना) सूर्योदय शिक्षण प्रसारक मंडळ कु. पिंपळगाव संचालित शरदचंद्रजी पवार माध्यमिक विद्यालय, मूर्ति या शाळेने एस.एस.सी. (मार्च/एप्रिल २०२५) बोर्ड परीक्षेत उजज्वल यश संपादन केले असून, एकूण ८३.०९ टक्के निकालाची नोंद केली आहे. या वर्षी परीक्षेला ५७ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ५३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यामध्ये विशेष प्राविण्यसह उत्तीर्ण ४, प्रथम श्रेणी १५, द्वितीय श्रेणी २३ आणि तृतीय श्रेणी ११ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे: कु. गायत्री गोविंदराव साळुंखे ८४.४०% (शाळेत सर्वप्रथम) कु. धनश्री सूनिलराव शिंदे ८३.६०% (द्वितीय क्रमांक) कु. शितल संदीपान सुराशे ७९.००% (तृतीय क्रमांक) या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेच्या सचिव मा. सौ. किरणताई तौर आणि अध्यक्ष मा. श्री. रवींद्र तौर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले असून, पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन!




# गोलापांगरी येथील नेहरू विद्यालयाचे यश...










प्रतिनिधी जालना तालुक्यातील गोलापांगरी येथील नेहरू विद्यालयाचे इयत्ता १० वीच्या निकालात यशाची परंपरा कायम ठेवत विद्यालयाचा ९१.४७% निकाल लागला असुन परिक्षेत एकूण १२९ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते पैकी ११८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विद्यालयातुन कु.वैष्णवी वसंत मोरे( ८८.६०%) प्रथम , कु.शारदा रायभान काटमोरे (८७%) व्दितीय तर कु.अंजली भागवत देव्हडे (८६%) हीने तृतीय क्रमांक पटकावला.

विद्यालयातुन समृध्दी प्रकाश शिंदे (८५.८०%), दिव्या ज्ञानेश्वर हाडसे (८०%),ऋतुजा चंद्रकांत बागल (८०%),प्रतीक्षा सुधीर बागल (७९.८०%) गुण घेत विशेष प्राविण्यसह उत्तीर्ण झाल्या.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे गोलापांगरी शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व सन्माननिय पदाधिकारी, मुख्याध्यापिका, मार्गदर्शक वर्गशिक्षक, विषय शिक्षक, शिक्षकेतर सहकारी कर्मचारी वृंद , गावकरी यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# शासनाच्या 65 गाव व घर घर जल मिशन योजनेची कहाणी

परभणी /पालम पालम तालुक्यातील पेठ शिवणी येथील शासनाच्या दोन दोन पाणीपुरवठा योजना सुरू आहेत.६५ गाव नळ योजना जल घर घर मिशन योजना असून नळात नाही पाणी अशी आहे या दोन दोन शासनाच्या योजनेची कहाणी . असे म्हणण्याची वेळ आज पेठ शिवणी करांवर आली असून सर्वसामान्य जनतेला पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली आहे गावातील विहीर बोरवेल आणि हातपंप यांना पाणी नसल्यामुळे नागरिकांना पाणी आणायचे कुठून? असा प्रश्न पडला आहे. शासन कोट्यावधी रुपये खर्चून योजना राबवीत आहे खरं. पण त्या योजने चा कोणताच उपयोग नसून त्या फक्त कागदोपत्री दिसून येत



आहेत. गावातील दोन दोन योजनेने पाणी पुरवले जाते हे फक्त कागदोपत्रीच पेठ शिवणी करांना पाणी मिळत आहे. पालम तालुक्यातील पेठ शिवणी मोठी बाजारपेठ व जास्त लोकसंख्या असलेले गाव म्हणून ओळखले जात आहे. त्याचबरोबर पाणी नसलेले गाव म्हणून सध्या पेठ शिवणी करांची नवीन ओळख निर्माण झाली असून. या गावांमध्ये अनेक वर्षापासून पाणीटंचाईचा प्रश्न निर्माण होत आहे. तो अद्यापही मार्गी लागलेला नाही शासनाच्या दोन दोन योजना नावालाच असून पेठ शिवनी ग्रामस्थांना आज पण पाण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे . मागील 18 फेब्रुवारी ला दैनिक देशोन्नती अंकाच्याबातमीमुळे बरीच अधिकाऱ्यांची ताराम्बळ उडाली होती व हालचाली सुरू झाल्या होत्या आणि आमदाराकडून पण पाहणी करण्यात आली होती. परंतु आणखी काही दिवसात परिस्थिती जैसेथे दिसून आली . अद्यापही पेठ शिवणी करांना पाण्यासाठी प्रायव्हेट बोरवेल च्या पाईपलाईन द्वारे सहाशे रुपये प्रति महिना दराने ते पण पाच ते सहा दिवसाआड पाणी दिले जाते आहे.किंवा टँकर व इतर वाहनाने पाचशे लिटर चे १५० व एक हजार लिटर पाण्याचे तीनशे रुपये घेतले जाते .पाणी वापरासाठी पैसे देऊन पण पेठ शिवणी करांना वेळेवर पाणी मिळत नाही. २०२१ रोजी सुरू झालेली जल घर घर योजना मिशन चे पाणी साठवण्यासाठी टाक्यांचे अद्यापही काम पूर्ण झालेले नाही. आज जवळपास योजना सुरू होऊन चार वर्षे होत आहेत तरीपण पाणी साठवण्यासाठी टाकीचे पण काम पूर्ण झाले नाही.पण गावातील रस्त्याची मात्र नासदुस्त झाली आहे

# भारताचं टेन्शन वाढलं? डोनाल्ड ट्रम्प यांचं पाकिस्तानबाबत मोठं वक्तव्य, नवी भूमिका काय?

अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प वारंवार युटर्न घेताना दिसत आहेत, भारत आणि पाकिस्तानमध्ये आपण मध्यस्थी केल्याचा दावा त्यांनी केला होता. त्यानंतर त्यांनी युटर्न घेतला. मी मध्यस्थी नाही तर मदत केल्याचं त्यांनी म्हटलं. दरम्यान आता पुन्हा एकदा ट्रम्प यांनी आपली भूमिका बदलल्याचं पाहायला मिळत आहे, डोनाल्ड ट्रम्प यांनी पाकिस्तानचं तोंडभरून कौतुक केलं आहे. पाकिस्तानचे लोक बुद्धिमान आहेत, ते खूप चांगल्या वस्तू तयार करतात असं ट्रम्प यांनी म्हटलं आहे. पाकिस्तानच्या निर्यातीवर 29 टक्के टॅक्स लागण्याची शक्यता आहे, या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांनी पाकिस्ताननचं कौतुक केलं आहे. मात्र दुसरीकडे ट्रम्प यांनी पुन्हा एकदा भारताच्या व्यापारी धोरणावरून नाराजी व्यक्त केली आहे. भारत हा जगातील सर्वाधिक कर आकारणारा देश असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. दुसरीकडे त्यांनी भारतासदंर्भात बोलताना मोठा गौप्यस्फोट देखील केला आहे. भारतानं अमेरिकन वस्तूंवरील सर्व कर रद्द करण्याची ऑफर दिली आहे, असा दावा ट्रम्प यांनी केला आहे. पाकिस्तानला अमेरिकेसोबत व्यापार करण्याची इच्छा आहे. पाकिस्तान अमेरिकेला 5 अब्ज डॉलरपेक्षाही जास्त वस्तुंची निर्यात करतो तर अमेरिकेडून केवळ 2.1 अब्ज डॉलरची आयात करतो असं ट्रम्प यांनी म्हटलं आहे. पहलगाममध्ये मोठा दहशतवादी हल्ला झाला होता, या दहशतवादी हल्ल्यामध्ये 26 जणांचा मृत्यू झाला, त्यानंतर भारतानं पाकिस्तानविरोधात कडक भूमिका घेतली, भारतानं पाकिस्तानवर केलेल्या एअर स्ट्राईकमध्ये पाक व्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानमधील 9 दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले, यामध्ये 100 पेक्षा अधिक दहशतवादी ठार झाले, त्यानंतर पाकिस्तानने देखील भारतावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव चांगलाच वाढला होता, अखेर डोनाल्ड ट्रम्प यांच्या मध्यस्थीमुळे भारत आणि पाकिस्तानने युद्धविरामाची घोषणा केली. तेव्हा देखील ट्रम्प यांनी व्यापाराबाबत असाच एक दावा केला होता, मात्र भारतानं हा दावा फेटाळून लावला, युद्ध विरामामध्ये कुठेही व्यापाराचा संबंध नसल्याचं भारतानं आधीच स्पष्ट केलं

# महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती नवी मुंबई जिल्हा आयोजित कार्यकर्ता शिबीर उत्साहात सपन्न

-कोपरखैरणे नवी मुंबई : महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती नवी मुंबई जिह्ला वतीने समितीचे काम करण्यास इच्छुक असणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी दिनांक १८ मे रविवार रोजी ज्ञानविकास विद्यालय,सेक्टर १७ कोपरखैरणे,नवी मुंबई येथे कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले होते. शिबिराचे उदघाटन नवे शहर वर्तमानपत्राचे उपसंपादक मा.राजेंद्र घरत सर यांचे हस्ते मेणबत्ती पेटवून करण्यात आले. आजच्या काळात समाजामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्याची फार मोठी गरज असून अनिसचे कार्य महत्त्वाचे आहे असे विचार माननीय घरत सर यांनी मांडले. यानंतर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची पंचसूत्री या विषयावर उत्कृष्ट सादरीकरण अशोक निकम यांनी केले.समिती ज्या पाच सूत्रावर कार्य करते त्याचा आशय व कालसुसंगता त्यांनी मांडली.यांनतर वैज्ञानिक दृष्टीकोन या विषयाची मांडणी पी.पी.टी.द्वारे मा.सुशीला मुंडे मॅडम यांनी उत्तमरित्या केली.. वैज्ञानिक दृष्टीकोन म्हणजे काय?त्याची परंपरा इतिहास, पृथ्वीची निर्मिती, मानवी उत्क्रांती,शास्त्रीय पद्धती इत्यादी



विविध मुद्दे त्यांनी सहज सोप्या शब्दात संवादी स्वरूपात मांडले. यालाच जोडून मन मनाचे आजार हा विषय प्रा.मच्छिन्द्र मुंडे सर यांनी घेतला.मन ,मनाचे आजार हा अवघड विषय त्यांनी संवादी स्वरूपात दैनंदिन उदाहरणे देऊन सादर केला. यात विविध भ्रम, भास, मनाचे आजार याची माहिती दिली.कार्यकर्त्यांनी मध्ये मध्ये चळवळची गाणी घेऊन वातावरण प्रफुल्लीत केले. दुपारच्या सत्रात परिचय झाल्यावर चमत्कारामागील विज्ञान सत्रात नंदकिशोर तळाशीलकर यांनी विविध प्रयोग व त्या मागील शास्त्रीय कारण स्पष्ट केले.यात हवेचा दाब,प्रश्नचिन्ह,लोट्यातून पाणी काढणे, पाण्यातील नाणे,कागदावर अक्षरे उमटवणे,इत्यादी प्रयोग कार्यकर्त्यांनी करून दाखवले व त्यामागील शास्त्रीय कारण सांगितले तसेच प्रा.मच्छिन्द्र मुंडे सर यांनी ही आकड्याचा खेळ,अग्नी पेटवणे,मनातील संख्या ओळखणे असे प्रयोग घेतलें. हे सर्व प्रयोग नवीन कार्यकर्ताना खूप आवडलें. असेच प्रयोग करून आपल्याला कसे फसवले जाते यांचे प्रत्यक्ष उदाहरण त्यांना दिसत होते. यांनतर समरोप भाषण मा. अरविंद सोनटक्के सर यांनी केले यात वैज्ञानिक दृष्टीकोन,चार्ल्स डार्विन यांचे कार्य, मानवी उत्क्रांती याचे महत्व सांगितले. सर्व शिबिरार्थींना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.कार्यक्रमाचे निवेदन प्रदीप कासुर्डे तसेच आभार प्रदर्शन राजेंद्र पंडित यांनी केले.शिबिराची सांगता हम होंगे कामयाब या गीताने होऊन पुढील काळात आपआपल्या विभागात शाखा बांधणी करून संगटनेच्या कार्यात सक्रिय होण्याचा निर्धार सर्वांनी केला.

# पाकिस्तान, तुर्कीनंतर आता चीनची बारी; भारताचा चायनाला मोठा दणका

पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये प्रचंड तणाव निर्माण झाला आहे. पाकिस्तानने भारतावर ड्रोन हल्ल्याचा प्रयत्न केला, त्यासाठी तुर्कीनं पाकिस्तानला मदत केली. पाकिस्तानने भारतावर हल्ला करण्यासाठी जवळपास 350 तुर्कीचे ड्रोन वापरले, तुर्कीने पाकिस्तानला मदत केल्याची मोठी किंमत आता त्यांनी चुकवावी लागत आहे, भारताकडून तुर्कीच्या मालावर बहिष्कार घालण्यात आला आहे, त्यामुळे तुर्कीचं मोठं नुकसान झालं आहे. दुसरीकडे आता भारतानं चीनला देखील मोठा दणका दिला आहे. चीन सुरुवातीपासूनच पाकिस्तानला पाठिंबा देत आला आहे, कधी उघडपणे तर कधी छुप्या पद्धतीनं चीनने पाकिस्तानला भारताविरोधात पाठिंबा दिला आहे, आता याचा मोठा फटका हा चीनला देखील बसला आहे. चीनची प्रमुख स्मार्टफोन निर्माता कंपनी असलेल्या श्याओमीच्या उत्पनाचे आकडे समोर आले आहेत. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीमध्ये कंपनीला मोठा झटका बसला आहे, गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी या कंपनीचं भारतातील उत्पन्न अर्ध्यावर आलं आहे, कंपनीच्या उत्पन्नामध्ये तब्बल 45 टक्क्यांची घसरण झाली आहे. मार्केट रिसर्च फर्म कॅनलिसच्या डेटा रिपोर्टनुसार, श्याओमीला चालू आर्थिक वर्षामध्ये पहिल्या तिमाहीत जीएसटी वगळून 47.2 मिलियन डॉलरचं उत्पन्न झालं आहे. मात्र गेल्या वर्षी पहिल्या तिमाहीत या कंपनीचं उत्पन्न जीएसटी वगळून 85.3 मिलियन डॉलर एवढं होतं. याचाच अर्थ या कंपनीच्या उत्पन्नामध्ये तब्बल





पन्नास टक्के एवढी मोठी घट झाली आहे. याचा मोठा फटका हा कंपनीला बसला आहे. तुर्कीवर बहिष्कार दुसरीकडे भारतानं तुर्कीच्या मालावर बहिष्कार घातला आहे. भारतीय व्यापाऱ्यांनी मोठा निर्णय घेतला आहे, तुर्कीच्या सफरचंदांवर बहिष्कार घातल्यामुळे याचा मोठा फटका हा तुर्कस्थानला बसला आहे. केवळ व्यापारीच नाही तर भारतातील चित्रपट व्यावसायिकांनी देखील तुर्कीमधील चित्रिकरणावर बहिष्कार घातला आहे. इथून पुढे तुर्कस्थानामध्ये एकाही चित्रपटाचं चित्रिकरण होणार नाही, अशी भूमिका चित्रपट व्यावसायिकांनी घेतली आहे. भारतीय पर्यटकांनी देखील तुर्कस्थानाकडे पाठ फिरवली आहे.

# भारत कवितके यांची पुण्यश्लोक अहिल्या समाज भूषण गौरव पुरस्कार २०२५ साठी निवड.

कांदिवली पश्चिम येथील धनगर समाजाचे जेष्ठ पत्रकार साहित्यिक गीतकार व सामाजिक कार्यकर्ते भारत कवितके यांना पुण्यश्लोक अहिल्या समाज भूषण गौरव पुरस्कार २०२५ साठी नुकतीच निवड झाली असल्याचे निवड पत्र समृद्धी पब्लिकेशन सिंधुदुर्ग अध्यक्ष प्रा.डॉ.बी. एन.खरात यांनी निवड पत्राद्वारे भारत कवितके यांना कळविले आहे.अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त अहिल्या भीम पर्व या कार्यक्रमात पुस्तक प्रकाशन, सन्मान सोहळा,गजल कार्यक्रम अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. भारत कवितके यांच्या कार्याचा गौरव म्हणून सदर पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.सामाजीक क्षेत्रातील भारत कवितके यांचे कार्य उल्लेखनीय आहे.रुग्णांना रुग्णालयातील सेवेसाठी तत्पर हजर,एस.आर.ए.कामातील अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्नशील, विभागात विविध शिबीरांचे आयोजन, शासनाच्या विविध योजनांचा तळागाळातील लोकांपर्यंत फायदा मिळवून देणे, सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहणे,अशा विविध सामाजिक उपक्रमात भारत कवितके अग्रेसर असतात.नुसती वळवळ न करता चळवळीने आंदोलनाने त्यांनी अनेक सामाजिक समस्या सोडविल्या आहेत.त्यांची आठ पुस्तके प्रकाशित झाली असून सर्वच पुस्तकांना राज्य स्तरीय पुरस्कार प्राप्त झालेले आहेत, त्यांच्या संघर्षमय जीवन प्रवासाचे आत्मचरित्र आयुष्य उसवताना हे सध्या सर्वत्र गाजत आहे.एकूण १० गाणी युट्यूबवर वर धुमाकूळ घालत आहेत, रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवित आहेत. अनेक चैनलवर, दैनिकात, भारत कवितके यांचे लिखाण सातत्याने प्रसिद्ध होत आहे.हा पुरस्कार भारत कवितके यांना १ जून २०२५ रोजी सकाळी ११वाजता बाळशास्त्री जांभेकर पत्रकार भवन स्मारक , सिंधुदुर्ग जिल्हा बँक जवळ, ओरोस , सिंधुदुर्गनगरी, तालुका कुडाळ या ठिकाणी मान्यवरांच्या हस्ते भारत कवितके यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

## अंत्यविधीसाठी निघालेल्या कुटुंबावर काळाची झडप, जगबुडी नदीत कार कोसळून 5 मृत्यूमुखी

मुंबई गोवा महामार्गावर भीषण अपघात झाला असून खेडमधील जगबुडी नदीपात्रात कार कोसळून 5 जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. मुंबईतील मिरा रोड येथून देवरूखच्या दिशेने निघालेल्या कुटुंबियांचा या घटनेत दुर्दैवी अंत झाला. धक्कादायक आणि तेवढीच दु:खद गोष्ट म्हणजे, अपघातग्रस्त कारमधील नागरिक हे नातेवाईकांच्या अंत्यविधीसाठीच देवरूखला जात होते. मात्र त्यांनाही वाटेत मृत्यूने गाठले. जगबुडी नदीच्या (Jagbudi River) पुलावरुन कार थेट 100 फूट खाली कोसळली. या घटनेत 5 जणांचा मृत्यू झाला तर कारचा चालक गंभीररित्या जखमी झाला आहे. त्याला तातडीने नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. नदीपात्रात मोटार कोसळल्याची माहिती मिळताच अनेकांनी जगबुडी नदी पुलाकडे धाव घेतली. या भीषण अपघातात कुटुंबातील 5 जणांनी जीव गमावल्यामुळे हळहळ व्यक्त होत आहे.

## ‘मोदीजी पहलगाम हल्ल्यातील दहशतवादी कुठे आहेत? तुमचं लक्ष..’, प्रकाश आंबेडकरांच हल्लाबोल

पहलगाममध्ये मोठा दहशतवादी हल्ला झाला होता, या हल्ल्यामध्ये 26 जणांचा मृत्यू झाला. दहशतवाद्यांनी धर्म विचारून पहलगाममध्ये आलेल्या पर्यटकांवर गोळीबार केला. या हल्ल्यानंतर भारतानं पाकिस्तानविरोधात मोठी कारवाई केली. भारतान ऑपरेश सिंदूर राबवून पाकव्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानवर एअर स्ट्राईक केला. या एअर स्ट्राईकमध्ये दहशतवाद्यांचे 9 अड्डे उद्ध्वस्त झाले, 100 दहशतवादी ठार झाले. त्यानंतर पाकिस्तानकडून देखील भारतावर हल्ल्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र भारतानं हे हल्ले परतून लावले, प्रत्युत्तर म्हणून भारतानं पाकिस्तानवर केलेल्या हल्ल्यात पाकिस्तानचं मोठं नुकसान झालं. दोन्ही देशांमधील तणाव प्रचंड वाढला, त्यानंतर अखेर अमेरिकेच्या मध्यस्थीनं भारत आणि पाकिस्तानने युद्धविरामाची घोषणा केली.

## नाईक, सुलाखे,चव्हाण, कुलकर्णी, शिर्के यांना आंतरराष्ट्रीय पुरस्कार

पुणे : 20 मे 2025 : जागतिक मधमाशी दिनानिमित्त सांजभेट आणि वर्ल्ड क्वीन बीज यांच्या संयुक्त विद्यमाने नुकताच कलावंत मेळावा आयोजित करण्यात आला होता. अध्यक्षस्थानी सांजभेट आणि वर्ल्ड क्वीन बीज संस्थांचे संस्थापक डॉ.मधुसूदन घाणेकर होते.सदर मेळाव्यात ‘ मधमाशी वाचवा : जग वाचवा ‘ या अभियानाच्या प्रसारकार्यास महत्वपूर्ण सहकार्य करणा-या कार्यकर्त्यांना डॉ. मधुसूदन घाणेकर यांच्या शुभहस्ते ‘ वर्ल्ड क्वीन बीज ॲवॉर्ड 2025 ‘ जाहिररित्या प्रदान करण्यात आले.प्रास्ताविक भाषणात वर्ल्ड क्वीन बीज संस्थेच्या अध्यक्ष मधुकर्णिका सारिका सासवडे यांनी जागतिक पातळीवर चालू असलेल्या ‘ मधमाशी वाचवा: जग वाचवा ‘ या अभियानाची महत्वपूर्ण माहिती दिली. युवा क्रांति संघटना पोलिस मित्र महाराष्ट्र राज्य महिला प्रदेशाध्यक्ष वसुधा नाईक, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अशोक सुलाखे , भारतीय जनता पार्टी - दिव्यांग सेलचे कार्यकर्ते अंकुश शिर्के तसेच विठ्ठल मुरकेवार , अशोक चव्हाण, नंदकिशोर गावडे,



सुनंदा कुलकर्णी, सुधाकर नाईक, मिलिंद जोगळेकर आदिंना डॉ. मधुसूदन घाणेकर यांच्या शुभहस्ते वर्ल्ड क्वीन बीज ॲवार्ड 2025 प्रदान करण्यात आले. मधमाशी वाचवा अभियान तसेच साहित्य ,सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रात दोन दशकांहून अधिक योगदान देणा-या मधुकर्णिका सारिका सासवडे यांचा डॉ.घाणेकर यांच्या शुभहस्ते विशेष जाहिर सत्कार करण्यात आला. यानिमित्त घेण्यात आलेल्या कलावंत मेळाव्यात मधुकर्णिका सासवडे, वसुधा नाईक, अशोक चव्हाण, सुनंदा कुलकर्णी , नंदकिशोर गावडे, शुभांगी कामत आदिंनी कविता, गाणी सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. या सोहळ्याचे औचित्य साधून डॉ.मधुसूदन घाणेकर संपादित विश्वविक्रमी डहाळी अनितकालिकाच्या 758व्या विशेषांकाचे प्रकाशन ज्येष्ठ कार्यकर्ते अशोक सुवाखे यांच्या शुभहस्ते जाहिर प्रकाशन करण्यात आले. विश्वकल्याणासाठी प्रत्येकाने यथाशक्य योगदान द्यावे असे आवाहन कार्यक्रमाच्या समारोपात डॉ.घाणेकर यांनी केले.

# महायुती सरकारमध्ये छगन भुजबळ यांना अखेर मंत्रिपद, २० मे रोजी घेणार शपथ

महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळातून या क्षणाची सर्वात मोठी बातमी समोर आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अनुभवी नेते छगन भुजबळ मंगळवारी 20 मे रोजी मंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी मुंबईतील राजभवनात सकाळी 10 वाजता छगन भुजबळ यांचा शपथविधीचा कार्यक्रम पार पडणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांच्याकडे असलेल्या खात्याची जबाबदारी आता छगन भुजबळ यांना दिली जाणार असल्याची माहिती आहे. छगन भुजबळ गेल्या अनेक महिन्यांपासून मंत्रिपद न मिळाल्याने नाराज होते. याबाबतची खंत त्यांनी वारंवार बोलून दाखवली होती. अनेकदा शेरोशायरी करून टोमणेही मारले होते. इतकंच काय तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही भेट घेतली होती. मात्र त्यांना काही मंत्रिमंडळात जागा मिळाली नव्हती. मात्र आता त्यांना मंत्रिपद मिळणार असल्याने भुजबळ समर्थकांमध्ये आनंदाचं वातावरण पाहायला मिळत आहे. त्यांच्या शपथविधी सोहळ्याला 50 जण उपस्थित



राहणार आहेत. यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची उपस्थिती असणार आहे. धनंजय मुंडे यांना बीडमधील सरपंच धनंजय देशमुख हत्या प्रकरणानंतर मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. तेव्हा मुंडेकडे अन्न व नागरी पुरवठा हे खातं होतं. मात्र मुंडेच्या राजीनाम्यानंतर मंत्रिपदावरुन वाद होऊ नये म्हणून पक्षाचे प्रमुख आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ते खातं स्वत:कडे ठेवलं होतं. मात्र आता पुन्हा एकदा भुजबळांना अन्न व नागरी पुरवठा या खात्याची जबाबदारी मिळण्याची शक्यता आहे. भुजबळांकडे मविआ सरकारमध्येही याच खात्याची जबाबदारी होती. छगन भुजबळ यांची ओबीसी नेते अशी ओळख आहे. त्यामुळे त्यांच्या या छबीचा महायुती सरकारला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत फायदा होऊ शकतो. ओबीसी मतांसाठी असा निर्णय घेतला असावा अशी चर्चाही राजकीय वर्तुळात रंगली आहे. महाराष्ट्र विधानसभा 2024 निवडणुकीत छगन भुजबळ येवला मतदारसंघातून उभे होते. यावेळी त्याने 1 लाख 34 हजार 154 मतं पडली होती. त्यांनी शरद पवार गटाच्या माणिकराव शिंदे यांचा पराभव केला होता. माणिकराव शिंदे यांना 1 लाख 8 हजार 2 मतं पडली होती.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com